स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्वाच्या राजकीय सहभागाचा चिकीत्सक अभ्यास - विशेष संदर्भ

उस्मानाबाद जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड सामाजिकशास्त्रे विदयाशाखेतील राज्यशास्त्र विषयात विदयावाचस्पती (पी.एच.डी.) पदवीसाठी करावयाचा शोध प्रबंधाचा

संक्षिप्त संशोधन आराखडा

- संशोधक -

प्रा.नकुल पोपट खवले (एम.ए.सेट)

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,

श्री. संत गजानन महाविदयालय, खर्डा

ता. जामखेड जि. अहमदनगर

- मार्गदर्शक -

डॉ. ए.एन.सिद्धेवाड

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

पीपल्स कॉलेज, नांदेड

२०१८

स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्वाच्या राजकीय सहभागाचा चिकीत्सक अभ्यास - विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा

प्रस्तावना -

भारताने संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार केलेला आहे. संघराज्य व्यवस्थेमध्ये केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवर शासनाचे कार्य चालते. आधुनिक राज्य ही प्रचंड प्रादेशिक विस्तार आणि लोकसंख्या असलेली आहेत. अशा विस्तृत राज्याचे प्रशासन केवळ एका मध्यवर्ती शासनाने करणे केवळ अशक्यच नाही. तर एक प्रकारे शासनाच्या अकार्यक्षमतेला निमंत्रण देण्यासारखे आहे. त्यामुळे प्रशासकीय कार्याची विभागणी पर्यायाने केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक शासन यात करणे अपरिहार्य ठरते. एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका यात ' स्थानिक शासन म्हणजे राज्यापेक्षा मर्यादीत असलेल्या प्रदेशांतर्गत निर्णय घेण्याचा व तो अंमलात आणण्याचा अधिकर होय. निर्णय व अंमलबजावणी स्वातंत्र्यावर भर असणे हे स्थानिक शासनाचे महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.' अशी व्याख्या केली आहे.

भारतात प्राचीन काळापासुन स्थानिक स्वराज्य संस्थेचा उल्लेख सापडतो. वैदीक काळामध्ये खेडे - ग्राम हा प्रशासनाचा पायाभूत घटक आहे. ब्रिटीशांनी भारतात केंद्रीकृत शासनपद्धती निमार्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ग्रामपंचायतीचा -हास झाला. पुढे काही प्रमाणात विकेंद्रीकरणचे प्रयत्न ब्रिटीशामार्फत करण्यात आले. त्यामधून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निर्मीतीला वाव मिळू लागला. १६८७ साली मद्रास शहरासाठी नगरनिगमाची स्थापना केली. पुढे ब्रिटीश सरकारने मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथे नगरपालिकांची स्थापना केली. १८७० साली लॉर्ड मेयो ने स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रारुप मांडले. त्यांनी नागरी प्रशासन व प्रांतीय प्रशासन यामध्ये विकेंद्रीकरणाचे धोरण प्रथम स्वीकारले. सन १८८२ मध्ये लॉर्ड रिपन ने स्थानिक स्वराज्य संस्थेविषयी ठराव मांडला या ठरावाचा मुख्य उद्देश भारतीय लोकांना स्थानिक स्वराज्य संस्थेत एक प्रकारचे प्रशिक्षण देणे होते. व मर्यादीत स्वरुपात स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्ता देणे हा होता. रिपनने लोक नियुक्त सदस्यांच्या हाती स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार जिल्हा लोकल बोर्डास सोपविण्याचा कायदा पास केल्याने लॉर्ड रिपनला स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक म्हणतात. इ.स. १९०७ मध्ये प्रशासनात सुधारणा व विकेंद्रीकरण घडवून आणण्यासाठी सी.इ.एच. हॉबहाऊस यांच्या अध्यक्षतेखाली रॉयल कमिशन ऑन डिसेंट्रालायझेन नियुक्त केले या आयोगाने ग्रामपंचायती मजबुत करण्याची शिफारस केली. इ.स. १९१९ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता विकेंद्रीकरण आयोग नेमण्यात आला त्यामुळे अनेक प्रांतात पंचायती कायदे पास झाले. त्यानुसार सर्व प्रांतामध्ये ग्रामपंचायत, जिल्हा बोर्ड, नगरपालिका यासारख्या स्थानिक संस्था स्थापन झाल्या. पंचायतराज या खात्याचा समावेश सोपीव खाते मध्ये होऊन तो भारतीयांकडे सोपविला. इ.स.१९३५ च्या कायदयाने द्विदल शासन पध्दती संपुष्टात येऊन प्रांतांना अधिक स्वायत्ता दिली. या कायदयाने ग्रामपंचायतीच्या अधिकारात वाढ होऊन सर्व जागा प्रौढ निर्वाचन पध्दतीने भरण्याची तरतुद झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांना राष्ट्रीय शासनाचा एक भाग मानून सत्तेच्या विकेंद्रीकरणाला महत्व प्राप्त झाले.

स्वातंत्र्य संग्राम काळात महात्मा गांधींनी लोकशाही विकेंद्रीकरण आणि सर्वांगीण विकासाचे साधन म्हणून स्थानिक स्वशासन संस्थेचा आपल्या 'रामराज्य' अथवा 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेचा पुरस्कार केला. गांधींनी ग्रामपंचायत हे ग्राम स्तरावरील भौतीक विकासाबरोबर मानसिक, नैतिक व अध्यात्मिक

विकासाचे केंद्र मानले होते. पंडीत नेहरु यांनाही लोकशाही याशस्वी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व मान्य केले होते.

भारतातील लोकशाही प्रणाली सुदृढ,सक्षम व विकसित करण्याच्या उद्‌देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकर केला. त्या दृष्टीकोनातुन स्थानिक संस्थांना स्वायत्ता व स्वातंत्र्य देण्यात आले. त्याला अनुसरुन १९४७ मध्ये ग्रामपंचायतीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्य घटनेची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय राज्य घटनेच्या चौथ्या भागात मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख आहे. त्यामध्ये कलम ४० मध्ये ग्रामपंचायतीची स्थापना करुन त्यांना जरुर ते अधिकार देण्यात यावेत. असे स्प्ष्ट केले. स्थानिक शासन हा विषय राज्यसुचित सामाविष्ट करण्यात आला. अनुच्छेत २४६ मध्ये स्थानिक स्वशासन संदर्भात राज्य विधीमंडळाला त्या संदर्भातील विषयावर कायदे करण्याचाही अधिकार दिलेला आहे. केंद्र शासनाने ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक पुनर्रचना करण्यासाठी ‘ सामुहीक विकास कार्यक्रम’ आणि ‘राष्ट्रीय विस्तार सेवेचा’ प्रारंभ केला. परंतु हे दोन्ही कार्यक्रम अपयशी ठरले. त्यांच्या अपयशाची कारणमीमांसा करण्यासाठी केंद्र सरकारने १९५७ मध्ये बलवंतराय मेहता समीतीची स्थापना केली. मेहता समितीने तीन स्तरांच्या स्थानिक स्वराज्याची कल्पना मांडली. ग्रामपंचायत तालुका, पंचायत व जिल्हा परिषद यांकडे अधिकर विषयक अनेक शिफारशी केल्या. तिच्या शिफरशी नुसार भारतात प्रथम पंचायतराजची स्थापना राज्यस्थान मध्ये ०२ ऑक्टोबर १९५९ रोजी करण्यात आली. त्यानंतर देशातील अनेक राज्यांनी स्थानिक शासन विषयक कायदे केले.

महाराष्ट्रात लोकशाही विकेंद्रीकरण संकल्पना कशी राबविता येईल यासाठी तत्कालीन ,महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली १९६० मध्ये समिती नियुक्त करण्यात आली. नाईक समितीने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार पुनर्विचार करुन आपल्या शिफारशी सादर केल्या. या शिफारशीवरच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मंजुर केला . यांनतर १९७० मध्ये ल.ना. बोंगीरवार समिती, १९८० मध्ये ग्रामविकास मंत्री बाबुराव काळे यांची मंत्रिमंडळ उपसमिती व १९८४ मध्ये प्राचार्य पी. बी.पाटील समिती नेमण्यात आली होती. अशा पध्दतीने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाची वाटचाल चालु होती. परंतु भारतीय संसदेने १९९२ मध्ये ७३ व्या घटना दुरुस्ती कायदा संमत केला.या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला. त्याची अंमलबजावणी २४ एप्रिल १९९३ पासून त्याची अंमलबजावणी सुरु झाली. या ७३ व्या घटना दुरुस्तीस २०१७ मध्ये २५ वर्ष पुर्ण झाली आहेत तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व व राजकीय सहभागाचा चिकीत्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

- संशोधनाची गरज व महत्त्व :-

भारताची ७० टक्केच्या जवळपास लोकसंख्या ही ग्रामीण भागत राहते. ग्रामीण भागच्या सर्वांगीन विकासासाठी पंचायतराजच्या माध्यमातुन शासनाद्‌वारे प्रयत्न केला जात आहे. ग्रामीण भागाच्या विकासात्मक धोरण निर्मीती मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था कशा प्रकारचे योगदान देत आहेत ? शासनाने राबविलेल्या विविध विकास योजना जनतेपर्यंत कितपत पोहचल्या आहेत ? ७३ व्या घटनादुरुस्तीद्‌वारे ग्रामीण नेतृत्वाचा उदय झालेला आहे का ? अनु.जाती व अनु. जमाती, इतर मागासप्रवर्गाचा निर्णय प्रक्रियेतील योगदान, महिलांचा राजकीय सहभाग अशा बाबी विषयी चिकीत्सक अभ्यास होणे आवश्यक आहे. यांचा अभ्यास गेल्या २५ वर्षातील कार्याचा संशोधनात्मक अभ्यास झालेला नाही. त्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व व राजकीय सहभागाचा चिकीत्सक अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद

जिल्हा हा अभ्यासविषय नेतृत्वाच्या राजकीय सहभागाच्या संदर्भात असल्याने तो इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शक ठरेल.

- पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :-

कोणतेही संशोधन करीत असताना त्या संशोधन विषयावर पुर्वी झालेल्या संशोधनाचा व लिखीत साधनांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते प्रस्तुत संशोधन विषयासाठी आवश्यक साहित्य आढावा पुढीलप्रमाणे

१))डॉ. रुबी ओझा (एस.एन.डी.टी. विदयापीठ, मुंबई) :-

'स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांचा सहभाग विशेष संदर्भ महाराष्ट्र' या प्रबंधात स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण यामध्ये समस्या कोणत्या आहेत व फायदे काय आहेत यांचा चिकीत्सक अभ्यास केलेला आहे.

२) डॉ. सतिश ठोंबरे :-

'जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन' या ग्रंथात ऐतिहासिक काळापासुन स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास विविध टप्यात कशा पध्दतीने झाला याचा आढावा घेतलेला आहे.

३) विकास खारगे (यशदा, पुणे) :-

'पंचायतराज व्यवस्था नवी भुमिका' पंचायतराज व्यवस्था कशा पध्दतीने लोकाभिमुख होण्यासाठी नवनवीन विकास योजना राबवुन नव्या भूमिकेत प्रवेश करत आहे या संदर्भात विकास खारगे यांनी विवेचन केलेले आहे.

४) डॉ. भावसार हेमलता -

पंचायतराज ग्रामीण नेतृत्व् विकास ग्रामीण विकासाचा मार्ग पंचायतराज या पुस्तकात लिहिलेल्या पंचायतराज आणि ग्रामीण नेतृत्व् विकास पंचायतराज संस्थांचे भवितव्य हे चांगल्या नेतृत्वावर अवलंबुन आहे ग्रामीण विभागांचा आर्थिक व सामाजिक विकास हा नेतृत्वाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो नेतृत्वासाठी आवश्यक असणारे घटक प्रभुत्वासाठी उपयोगी ठरत असतात.

५) भीमराव झगडे :-

पंचायतराज व आरक्षितांचे प्रश्न या ग्रंथात पंचायतराज संस्थेतील आरक्षित घटकांचे नेतृत्व सबल व्हावे या प्रामाणिक हेतूने आरक्षीतांच्या वास्तविक राजकीय समस्यांपेक्षा सामाजिक समस्यांचे स्वरूप हे खूपच विदारक असते असे निष्कर्ष मांडले आहेत.

६) डॉ.प्रकाश पवार :-

'भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल' या संशोधनपर ग्रंथात नेतृत्वाची संकल्पनात्मक व सैद्धांतिक मांडणी करून राजकीय नेतृत्व संकल्पनेतील पेचप्रसंग आणि राजकीय व्यवहार राजकीय धुरिणत्व

आणि वर्चस्ववादी निवडक प्रारूपे नेतृत्व आणि प्रतिनिधित्वाचे दावे प्रादेशिक नेतृत्व अशी संकल्पना मांडत त्यांच्यावरील सामाजिक शक्तीचे नियंत्रण व सामाजिक हितसंबंध यांची मांडणी केलेली आहे.

७) संजयकुमार प्रधान आणि गितांजली :-

‘महिलांचे अधिकार सक्षमीकरण आणि भारतीय पंचायतराज पद्धती’ या ग्रंथात १९९२ मधील ७३ व्या घटना दुरुस्तीचा महिलांच्या सक्षमीकरणासाठी कितपत उपयोग झाला आहे याबद्दल सविस्तर विवेचन केले आहे.

८) अतुल पगार :-

‘उस्मानाबाद जिल्हा’ या प्रस्तुत पुस्तकात अतुल पगार यांनी उस्मानाबाद जिल्हा भौगोलिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी या विषयी विचार मांडले आहेत.

९) सुहास पळशीकर व नितीन बिरमल (संपा) :-

‘महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ’ या संपादित करण्यात आलेल्या पुस्तकात चंपत बोड्डेवार यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील पक्षीय राजकारणाचा आढावा घेणारा संशोधनपर लेखात उस्मानाबाद जिल्ह्यातील राजकारणाचा आढावा घेतलेला आहे.

- संशोधनाची उद्दिष्टे :-
  १) ७३ व्या घटनादुरुस्ती नंतर उस्मानाबाद जिल्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा राजकीय व अर्थिक स्वायत्तेचे स्वरूप अभ्यासणे.
  २) सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे लोकांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभागाचा संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या अभ्यास करणे.
  ३) पंचायतराज मधील आरक्षण धोरणामुळे उस्मानाबाद जिल्यातील झालेल्या सामाजिक व राजकीय बदलाचा अभ्यास करणे.
  ४) महिला नेतृत्वाच्या विकासातील विविध अडसर जाणून घेणे.
  ५) ग्रामीण विकासातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योगदानाचा आढावा घेणे.
- संशोधनाची गृहितकृत्ये :-
  १) पंचायतराज संस्थांमधील आरक्षण या धोरणामुळे अनु.जाती, अनु.जमाती, इतर मागास वर्ग आणि महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील संख्यात्मक सहभाग वाढला असून गुणात्मक सहभागाचे प्रमाण समाधानकारक नाही.
  २) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला नेतृत्वाच्या विकासात पुरुष प्रधान व्यवस्थेची उदासीनता व महिलांच्या ठिकाणी राजकीय महत्वकांक्षेचा असलेला अभाव हा प्रमुख अडसर आहे.
  ३) स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विकसित झालेल्या महिला नेतृत्वाने राजकीय सहभागाच्या चढत्या पायरीवरील आपले सातत्य राखले नाही.
  ४) उस्मानाबाद जिल्ह्यातील ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून नावे नेतृत्व उदयास येत आहे.
  ५) ग्रामपंचायत स्थरावरील राजकीय नेतृत्वाला ग्रामपंचायतला आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यात अपयश आले आहे.

- **संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-**

संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन क्षेत्र हे उस्मानाबाद जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. या विषय क्षेत्राच्या अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व व राजकीय सहभागाचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. या संशोधनासाठी केवळ उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचाच विचार केला जाईल.

- **नमुना निवड :-**

प्रस्तुत संशोधनासाठी श्रम,पैसा आणि कालावधी या सर्व गोष्टींचा विचार करून नमुना निवड करण्यात आली आहे यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील आठ तालुक्यातून प्रातिनिधीकस्वरुपात सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांची निवड करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि ग्रामपंचायतीच्या संदर्भात प्रातिनिधिक स्वरुपात नमुना निवड करण्यात येणार आहे.

- **संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक, गुणात्मक, वर्णनात्मक, संख्यात्मक, तुलनात्मक, विश्लेषणपद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तथ्य संकलनाच्या आधारे १९९२ - २०१७ कालावधी मधील उस्मानाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यापध्दतीचे अध्ययन करून या कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व व राजकीय सहभागाचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल.

- **तथ्य संकलनाची साधने :-**

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनाची प्राथमिक आणि दुय्यम साधने वापरण्यात येणार आहेत.

अ) प्राथमिक साधने :-

स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व व राजकीय सहभागाचाचिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा या संशोधन विषयाला अनुसरून तथ्य संकलनासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील निवडक प्रशासकीय अधिकारी, निर्वाचित सदस्यांकडून प्रश्नावली, मुलाखती व औपचारिक चर्चेच्या आधारे संशोधनासाठी आवश्यक तथ्य संकलन करण्यात येईल.

ब) दुय्यम साधने :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी तथ्य संकलन करताना दुय्यम साधने म्हणून उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती बैठकांचे इतिवृत्त, राज्य निवडणूक आयोगाचे अहवाल, शासनाचे प्रकाशित केलेले प्रमुख दस्तऐवज व अहवाल, संशोधन विषयाची संबंधित प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ साहित्य, नियतकालिके,लघुशोध प्रबंध व विविध स्तरावरील चर्चासत्रातील, कार्यशाळेतील शोधनिबंध, विविध संकेत स्थळे इत्यादींचा वापर माहिती संकलन करताना करण्यात येईल.

- **प्रकरण रूपरेषा :-**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी प्रकरण योजना पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

१) प्रकरण पहिले :- प्रस्तावना:-

प्रस्तुत प्रकरणात पूर्व संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाची आवश्यकता व महत्व संशोधनाची उद्‌दिष्टे, गृहीतके,संशोधन पद्‌धती, संशोधन विषयाची निवड, समस्या, संशोधनाच्या मर्यादा , संशोधन आराखडा यांचा अभ्यास करण्यात येईल.

- प्रकरण दुसरे :- स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास व दृष्टीक्षेप

  अ) स्थानिक स्वराज्य संस्थेची पार्श्वभूमी

  १) प्राचीन - स्वातंत्र्यपर्यंत

  २) स्वातंत्र्योत्तर काळ - (१९९२ पर्यंत)

- प्रकरण तिसरे :- उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे बदलते स्वरूप

  १) ७३ व्या घटना दुरुस्तीची पार्श्वभूमी

  २) ७३ व्या घटना दुरुस्ती - आर्थिक व सामाजिक घटक

  ३) राजकीय नेतृत्वाची संकल्पना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्व बदल

  ४) राजकीय सहभागाची संकल्पना आणि राजकीय सहभागाचे बदलते स्वरूप

- प्रकरण चौथे - उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्वाचा राजकीय सहभाग सर्वेक्षणात्मक अध्ययन

प्रस्तुत प्रकरणात उस्मानाबाद जिल्ह्यातील जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत पातळीवरील प्रातिनिधिक नमुना निवड पद्‌धतीनुसार निवडल्या गेलेल्या प्रतीसादकांकडून संरक्षित प्रश्नावलीच्या आधारे सर्वेक्षनात्मक अध्ययन करण्यात येईल.

- प्रकरण पाचवे - सारांश / निष्कर्ष

  संशोधनासाठी निवडलेला अभ्यास विषयासंबंधी उपरोक्त प्रकरणाअंतर्गत संशोधन कार्य करण्यात येणार असुन अभ्यासाअंती प्राप्त निष्कर्षांची मांडणी करण्यात येईल.

- संदर्भ सूची :-

१) प्रा.कुलकर्णी अ.ना., 'भारतातील स्थानिक स्वशासन' विदया प्रकाशन, नागपूर, २०००

२) खेकाळे ना.रा., 'राजकीय नेतृत्व' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

३) प्रा.डॉ.ठोंबरे सतीश, 'जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन' कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद

४) दाते एखेळीकर, 'भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थां' शारदा प्रकाशन, नांदेड

५) पाटील भारती, 'स्त्रियांचा सत्तेतील सहभाग सबलीकरण प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा'

६) भोळे भा.ल., 'भारताचे शासन आणि राजकारण' पायल प्रकाशन, नागपूर

७) विभुते भालबा, 'पंचायतराज व्यवस्था' मनोविकास प्रकाशन, मुंबई

८) साठे निर्मला, 'पंचायतराज आणि आपण' आलोचना प्रकाशन, पुणे

९) 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ महाराष्ट्र शासन'

१०)डॉ. भगणे रवींद्र पांडुरंग, 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थां' प्रशांत पब्लिकेशन, पुणे २०१२

११) डॉ.नितीन बिरमल,डॉ.वैशाली पवार, 'महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थां' डायमंड पब्लिकेशन, पुणे

१२) डॉ.शाम शिरसाठ,प्रा.भगवानसिंग बैनाडे 'पंचायतराज आणि नागरी प्रशासन' विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद २०१४
१३) प्रा. व्ही. बी. पाटील महाराष्ट्रातील पंचायतराज आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां' के सगर पब्लिकेशन, पुणे २०१७
१४) विकास खर्गे ' पंचायत व्यवस्था नवी भूमिका' यशदा, पुणे
१५) भोळे भा.ल.' संशोधनाची क्षितिजे' , साकेत प्रकाशन, नागपूर
१६) शेळके भास्कर,' संशोधन स्वरूप आणि पद्धती' शब्दश्री प्रकाशन, जुन्नर.
१७) डॉ. अर्जुनराव दर्शनकार, 'पंचायतराज व नागरी प्रशासन,' कैलास पब्लिकेशन औरंगाबाद,१९९९
१८) विजय रंजनदत्त , 'पंचायतराज संकल्पना और वर्तमान स्वरूप'
१९) डॉ. प्रदीप सचदेव 'भारत में नगरीय स्थानीय एंव प्रशासन'
२०) डॉ.रामभाऊ बळीराम भाकरे, 'भारत में पंचायतीराज एंव राजनीतिक दल' इशिका पब्लिशिंग हाउस, जयपूर २०१५
२१) S.L. Goel & shalini Rajneesh Panchayatraj in india Theory & Practice Deep & Deep publication Pvt LTd New Dehli.
२२) N.P. Shukla ,Local self Government in india, Navyug Books.
२३) Pradeep Sachedeva, Local Government in India, Pearson books
२४) S.R. Myneni , Local Self Government,Allahabad Law agency.

संशोधक

प्रा.नकुल पोपट खवले

मार्गदर्शक

डॉ. ए.एन.सिद्धेवाड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
पीपल्स कॉलेज, नांदेड